# पानझड

याही वर्षी पानझड झालीच !

झाडं कशी ओकीबोकी दिसतात नाही !

काळयाशार मेघाला चोच घासत बसणाऱ्या चातकासारखी !

काहीही असो... याही वर्षी पानझड झालीच !

नको वाटते नाही पानझड ! झाडं कशी विद्रूप दिसतात !

लाल पिवळी बावरी फुलं... उगीचंच निखळतात !

पानाफांद्यांचं मेतकूट कसं बरं एका दिवसात फिस्कंटलं?

डवरलेलं मोहक झाड घरटयासकट विस्कंटलं !!

झाडंही उपवास करत असावं !

नसेल, तर निदान तसं दाखवंत तरी असावं !

उगाच का ना हुक्की येते त्याला कफल्लक होण्याची?

का देऊन देऊन दमलेल्या त्याला गरज वाटते थांबण्याची!

धरणीच्या गर्भातून शोषून शोषून ते उत्तर शोधंतच असणार...

आभाळाकडे एकटक बघत हताश मुकाट बसणार !

त्यालाही शिसारी येत असावी... घेणाऱ्याच्या हातांची !

हपापलेल्या, भुकाळलेल्या अस्ताव्यस्त गरजांची !!

मुकं बिचारं निष्पर्ण झाड !!

झडलं असेल वर्षातून कधीतरी...

त्याला तेवढीही मुभा द्यायची नाही?

झाडासारखंच झाड बिचारं... पानंही पानांसारखीच !

सख्य असो वैर असो, "पानझड" आलीच !

**शब्द : प्राजक्ता गव्हाणे© , अभिवाचन: डॉ. अमोल कोल्हे, संगीत : तेजस चव्हाण,**

**गीत संग्रह/चित्रपट : कण्हेरीची फुले (२०१२)**

Prajakta's Copyright